फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९२४५ / २२९३२५

Phone : (02462) 229242 / 43
Fax : (02462) 229245 / 229325

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

शैक्षणिक/सलग्न/०३/२००९–१०/ 863

दिनांक ११.०८.२००९

प्रती,
मा. अध्यक्ष/सचिव,
सावित्रीबाई फुले महिला विकास प्रतिष्ठाण, कंधार
ता. कंधार जि. नांदेड.

विषय:– **शैक्षणिक वर्ष २००८–०९ करीता जिजउ अध्यापक महाविद्यालय, धनेगाव, नांदेड येथील महाविद्यालयास बी. एड. या अभ्यासक्रमासाठी प्रथम संलग्निकरण देणे बाबत.**

संदर्भ :– १. शैक्षणिक/संलग्न/०३/२००८–०९/ १४१८ दिनांक.०७.१०.२००८
२. शैक्षणिक/संलग्न/०३/२००८–०९/ ७२३६ दिनांक:३०.०४.२००९

महोदय,

प्रस्तुत विद्यापीठाच्या संदर्भीय पत्र क्र. ०१ अन्वये आपल्या संस्थेच्या **जिजाउ अध्यापक महाविद्यालय, धनेगाव जि. नांदेड या नवीन बी.एड. या** अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयास अटींच्या पुर्ततेच्या अधीन राहून शै.वर्ष २००८–०९ साठी तात्पुरते सलग्निकरण देण्यात आले आहे. मा.विद्यापरिषदेत विषय क्र १००/२१–२००८ अन्वये आपल्या महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण देण्यासाठी महाविद्यालया ने अटींची पुर्तता केली किंवा नाही हे पाहण्यासाठी संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये समिती पाठविण्यात आली .समितीने महविद्यालयाने त्रुटीचा पुर्तता केल्याचा अहवाल सादर केला आहे. तरी शै.वर्ष २००८–०९ करीता आपल्या महाविद्यालयास बी.एड. या अभ्यासक्रमास प्रथम संलग्निकरण देण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २००९–१० पासून उपरोक्त अभ्यासक्रमाच्या संबधीत विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी महाविद्यालयात कायम अर्हताप्राप्त प्राचार्य, शिक्षक, ग्रंथपाल यांची विद्यापीठ निवड समिती मार्फत निवड करण्यांसाठी सदर पदाचा जाहिरात मसूदा विद्यापीठाचे उप कुलसचिव, विशेष कक्ष, यांच्या कडून मंजूर करून घ्यावा. प्राचार्य पदाची जाहिरात राष्ट्रीय वर्तमान पत्रात व इतर पदाची जाहिरात राज्य पातळीवरील वर्तमान पत्रात देण्यांत यावी व मा.कुलगुरू प्रतिनिधी व विषय तज्ञाच्या नावाची मागणी विद्यापीठास करण्यांत यावी याप्रमाणे विद्यापीठ निवड समिती मार्फत सदर पदे भरण्यात यावी. तसेच शिक्षकेत्तर कर्मचा–यांचे पदे नियमानुसार भरण्यांत यावीत.

वरील अटी पूर्ण करण्याचे हमीपत्र रू. १००/– च्या बांडपेपर संस्था अध्यक्ष/सचिव यांनी प्रथम संलग्निकरणाचे पत्र मिळताच ०७ दिवसांच्या आत विद्यापीठात सादर करणे बंधनकारक आहे. तसेच वरील अटींची पूर्तता शैक्षणिक वर्ष २००९–१० मध्ये करण्यांत यावी. अन्यथा संलग्निकरणाचे नूतनीकरण करता येणार नाही.

महाविद्यालयास परवानगी देतेवेळी शासन पत्रात नमुद केलेल्या अटी व नियम तसेच विद्यापीठ समितीने नमुद केलेल्या अटी आणि विद्यापीठाने व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांचे पालन करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील.

आपला विश्वासू

**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–
१) मा.सहसंचालक, उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड.
२) मा. परीक्षा नियंत्रक, प्रस्तूत विद्यापीठ.
३) सहायक कुलसचिव, शैक्षणिक विभाग, प्रस्तूत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तूत विद्यापीठ.